याला श्राप देऊ नका, कारण मला ठाम विश्वास आहे की तो अल्लाह व त्याच्या प्रेषितांशी सल्लल्लाहु अलैही व सल्लम प्रेम करतो

उमर बिन खत्ताब अल्लाह प्रसन्न असो त्यांच्यावर वर्णन करतात की: प्रेषितांच्या सल्लल्लाहु अलैही व सल्लम काळात एका व्यक्तीचे नाव अब्दुल्ला होते, तसेच त्याचे टोपण नाव हमार (गाढव) होते, तो प्रेषितांना सल्लल्लाहु अलैही व सल्लम नेहमी हासवत होता, दारुची नशा केल्यामुळे प्रेषितांनी सल्लल्लाहु अलैही व सल्लम त्याला (चाबका) कोड्याची शिक्षा सुद्धा दिली होती, एका दिवसी पुन्हा त्याला पकडुन आणण्यात आले, कारण
तो नशाधिन होता, प्रेषितांनी सल्लल्लाहु अलैही व सल्लम पुन्हा त्याला कोडे
मारण्याचा आदेश दिला, त्यामुळे त्याला कोड्याची सजा देण्यात आली, जमावापैकी एकाने म्हटले: हे अल्लाह, याला श्रापीत कर, याला वारंवार व्यसनाधीनते मुळे आणण्यात येते? त्यावर प्रेषित सल्लल्लाहु अलैही व सल्लम उदगारले:<>. [صحيح] [رواه البخاري]

प्रेषित मुहम्मद सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांच्या काळात अब्दुल्ला नावाचा एक माणूस होता, त्याला हिमार असे टोपणनाव होते, तो कधी कधी आपल्या बोलण्याने प्रेषितांना हसवायचा, दारू पिण्याच्या कारणाने त्याला यापूर्वीही शिक्षा झाली होती, एकदा पुन्हा तो दारू पिलेल्या अवस्थेत आणला गेला, तेव्हा प्रेषितांच्या आदेशाने त्याला फटके मारण्यात आले. तेव्हा उपस्थितांपैकी एका व्यक्तीने त्याला वाईट बोलले आणि म्हणाला: अल्लाह याच्यावर लानत करो, किती वेळा याला दारू पिलेल्या अवस्थेत आणले जाते?! यावर प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम म्हणाले: त्याच्यावर अल्लाहच्या दयेपासून दूर होण्याची बद्दुआ करू नका, कारण मला त्याच्याबद्दल इतकेच माहीत आहे की तो अल्लाह आणि त्याच्या रसूलवर प्रेम करतो.

https://sunnah.global/hadeeth/mr/show/66214